**रोजगार हमी योजना -**
**केंद्र शासनाच्या माहितीचा अधिकार-२००५ नुसार सहाय्यक माहिती अधिकारी, शासकीय माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी घोषित करण्याबाबत...**

महाराष्ट्र शासन,
नियोजन विभाग,
शासन आदेश क्रमांक:- ममाअ २००४/प्र.८/रोहयो-१२,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक : - ५ ऑक्टोबर २००५.

संदर्भ :- १) शासन ज्ञापन , नियोजन विभाग क्र.आस्थाप-११०३/प्र.४८/ रोहयो-३ दिनांक १४.५.२००३.
२) शासन निर्णय, नियोजन विभाग क्र.आस्थाप-११०३/प्र.४८/ रोहयो-३ दिनांक २९.३.२००४.
३) शासन ज्ञापन , नियोजन विभाग क्र .ममाअ २००४/प्र.८/ रोहयो-३ दिनांक १७.१.२००५.
४) शासन परिपत्रक , सामान्य प्रशासन विभाग क्र केमाअ -२००५/ प्र.१९०/ ०५/५, दिनांक १८.६.२००५.
५) शासन आदेश क्रमांक , नियोजन विभाग क्र .ममाअ २००४/प्र.८/ रोहयो-१२, दिनांक २२.७.२००५.
६) सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक क्रमांक: केमाअ-२००५/ प्र.क्र.१९०/०५/५, दि. १८.६.२००५, ६.८.२००५ व ६.९.२००५.

**शासन निर्णय.**

माहितीच्या अधिकारा संदर्भातील केंद्र शासनाचा माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ केंद्र शासनाच्या दिनांक २१ जून, २००५ च्या राजपत्रात प्रसिध्द करण्यात आला आहे. या संदर्भात केंद्र शासनाच्या दिनांक २६ मे, २००५ च्या पत्रात नमूद केलेल्या मुद्यांबाबत आवश्यक ती कार्यवाही करण्याच्या सूचना संदर्भाधीन दिनांक १८ जून, २००५ च्या परिपत्रकान्वये देण्यात आल्या आहेत. केंद्र शासनाचा माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ राज्य शासनाच्या विधी व न्याय विभागाकडून दिनांक २१ जून २००५ च्या राजपत्रात पुन्हा प्रसिध्द करण्यात आला आहे.

२. केंद्र शासनाचा माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ आता अस्तित्वात आला असल्याने, सामान्य प्रशासन विभागाच्या संदर्भाधीन दिनांक ६.८.२००५ च्या परिपत्रकातील परिच्छेद ५ नुसार या अधिनियमांतर्गत राज्य शासकीय सहायक माहिती अधिकारी, राज्य शासकीय माहिती अधिकारी आणि अपिलीय प्राधिकारी यांच्या नव्याने नियुक्त्या करणे आवश्यक झाले आहे. त्यामुळे यापूर्वी या संदर्भात काढण्यात आलेला या विभागाचा संदर्भ क्रमांक ५ येथील दिनांक २२.७.२००५ चा शासन आदेश अधिक्रमित करुन केंद्र शासनाच्या माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतुदीनुसार आता सुधारीत आदेश निर्गमित करण्यात येत आहेत.

३. केंद्र शासनाच्या माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम ५ (२) नुसार माहिती प्राप्त करुन घेण्याकरीता या अधिनियमातील तरतुदी अंतर्गत नागरीकांकडून येणारे अर्ज, अपिलीय अर्ज स्वीकारुन ते संबंधित राज्य शासकीय माहिती अधिकारी/ अपिलीय प्राधिकारी यांना उपलब्ध करुन देण्याकरीता केंद्र शासनाच्या माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम-५ (१) व १९ नुसार सोबतच्या परिशिष्ट-"अ" प्रमाणे शासन नियोजन विभाग (रोहयो प्रभाग), विभागीय आयुक्त कार्यालय, जिल्हाधिकारी कार्यालय (मुंबई शहर व उपनगरे वगळून) आणि तहसिल कार्यालय या स्तरावर स्तंभ क्र.२ मध्ये दर्शविलेल्या विषयासाठी स्तंभ क्र.३,४ व ५ मध्ये दर्शविलेले पदनाम धारण केलेल्या अधिका-यांना अनुक्रमे सहाय्यक माहिती अधिकारी, शासकीय माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

स्वाक्षरीत/-
( स.अ. जयवंत )
उप सचिव (रोहयो) नियोजन विभाग.

प्रति,
मा.राज्यपालांचे सचिव,
मा.मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव,
मा.उपमुख्यमंत्र्यांचे सचिव,
सर्व मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
मुख्य सचिव,
शासनाचे सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव,
प्रबंधक, उच्च न्यायालय, मूळ न्याय शाखा, मुंबई.
प्रबंधक, उच्च न्यायालय, अपील न्याय शाखा, मुंबई.
प्रबंधक, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई.
प्रबंधक, लोक आयुक्त व उप लोक आयुक्त, मुंबई.
सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई.
सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,विधान भवन,मुंबई.
सचिव, राज्य निवडणूक आयोग, मुंबई.
सर्व मंत्रालयीन विभाग.
मुख्य अभियंता व सह सचिव (रोहयो),
सर्व सह सचिव/ उपसचिव / अवर सचिव, नियोजन विभाग,
सर्व विभागीय आयुक्त,
सर्व जिल्हाधिकारी, (मुंबई शहर व उपनगरे वगळून)
सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,
सर्व तहसिलदार,
सामान्य प्रशासन विभाग,कार्यासन-५, मंत्रालय, मुंबई.
सर्व कक्ष अधिकारी, (रोहयो प्रभाग),
कक्ष अधिकारी, कार्यासन-१४२१, १४२३ व १४२५, नियोजन विभाग,
निवड नस्ती, रोहयो-१२.

**शासन आदेश नियोजन विभाग क्र.ममाअ-२००४/प्र.८/रोहयो-१२,**
**दिनांक ५.१०.२००५ सोबतचे प्रपत्र**

| अ क्र | विषय | सहाय्यक शासकीय माहिती अधिकारी पदनाम, कार्यासन व दूरध्वनी क्रमांक | शासकीय माहिती अधिकारी पदनाम व दूरध्वनी क्रमांक | अपिलीय प्राधिकारी पदनाम व दूरध्वनी क्रमांक |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | नागपूर, अमरावती व कोकण विभाग सर्व सामान्य बाबी. | कक्ष अधिकारी, रोहयो-१ २२०२८४१२ २२७९३९१० | अवर सचिव, २२०२८४१२ २२७९३९१० | उपसचिव (रोहयो) २२०२३५६५ २२७९३८६७ |
| २ | रोहयो अंतर्गत सर्व विभागातील विभागीय चौकशी बाबत. | कक्ष अधिकारी, रोहयो-२ २०२५१७० २२७९३७२२ | अवर सचिव, २२०२५१७० २२७९३६४० | --"-- |
| ३ | आयुक्त, जिल्हास्तरावरील रोहयो आस्थापना व तद्नुषंगिक सर्व बाबी, हजेरी सहायक,नियोजन विभागातील रोहयो प्रभागातील आस्थापना, | कक्ष अधिकारी, रोहयो-३ २२०२८४१२ २२७९३९१० | अवर सचिव, २२०२८४१२ २२७९३९१० | --"-- |
| ४ | नाशिक विभागातील सर्व बाबी व नवसंजीवन योजना. | कक्ष अधिकारी, रोहयो-४ २२०२८४१२ २२७९३९१० | अवर सचिव, २२०२५१७० २२७९३६४० | --"-- |
| ५ | औरंगाबाद विभागातील सर्व साधारण बाबी. | कक्ष अधिकारी, रोहयो-५ २२०२८४१२ २२७९३९१० | अवर सचिव, २२०२८४१२ २२७९३९१० | --"-- |
| ६ | रोहयो कामासंदर्भात धोरणात्मक बाबी, पुणे विभागातील सर्व सामान्य बाबी,राज्यपालांचे अभिभाषण. | कक्ष अधिकारी, रोहयो-६ २२०२८४१२ २२७९३९१० | अवर सचिव, २२०२८४१२ २२७९३९१० | --"-- |
| ७ | रोहयो अर्थसंकल्प व अनुषंगिक सर्व बाबी. | लेखा अधिकारी, रोहयो-७ २२०२५१७० २२७९३७२२ | अवर सचिव, २२०२५१७० २२७९३६४० | --"-- |
| ८ | सर्व प्रकारचे राज्य, जिल्हा व पंचायत समिती स्तरावरील समिती विषयक कामकाज. रोहयो प्रसिध्दी विषयक कामकाज, भूसंपादन कलम १८ खालील प्रकरणे, श्री.अण्णा हजारे यांचे मार्फतच्या प्रकरणांचे समन्वय, संसद सदस्य, विकाक संदर्भ, बैठका समन्वय. | कक्ष अधिकारी, रोहयो-८ २२०२८४१२ २२७९३९१० | अवर सचिव, २२०२५१७० २२७९३६४० | --"-- |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| `९ | रोहयो योंजनेची सांख्यिकी माहिती, मूल्यमापन, राज्य नियोजन मंडळाच्या रोहयोसाठी उपसमिती बाबतचे कामकाज, टंचाईबाबत. | संशोधन अधिकारी, रोहयो-९ २२०२८४१२ २२७९३९१० | अवर सचिव, २२०२८४१२ २२७९३९१० | --"-- |
| १० | मजूरांना धान्य वाटप विषयक बाबी, मजूरी दरविषयक बाबी, रोहयो अधिनियम १९७७ मध्ये दुरुस्ती करणे. वैयक्तिक लाभदायक स्वरुपाच्या योजना | कक्ष अधिकारी, रोहयो-१० २२०२५१७० २२७९३७२२ | अवर सचिव, २२०२५१७० २२७९३६४० | --"-- |
| ११ | महाराष्ट्र विधानमंडळ रोहयो समितीचा अहवाल व अनुषंगिक सर्व बाबी पंचायत राजसमिती अहवाल रोहयो समितीची साक्षी बाबतचे मुद्दे. | कक्ष अधिकारी, रोहयो-१२ २२०२८४१२ २२७९३९१० | अवर सचिव, २२०२५१७० २२७९३६४० | --"-- |
| **२) विभागीय आयुक्त कार्यालय** | | | | |
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | रोजगार हमी योजनेशी संबंधित सर्व विषय | तहसिलदार (रोहयो शाखा) | उपायुक्त (रोहयो) | विशेष कार्य अधिकारी व पदसिध्द् उपविकास आयुक्त (रोहया) |
| **३) जिल्हाधिकारी कार्यालय (मुंबई शहर व उपनगर वगळून)** | | | | |
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | रोजगार हमी योजनेशी संबंधित सर्व विषय | उपलेखापाल (रोहयो शाखा) | उपजिल्हाधिकारी (रोहयो) ते पद नसल्यास तहसिलदार (रोहयो) | जिल्हाधिकारी |
| **४) तहसिलदार कार्यालय** | | | | |
| `१ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | रोजगार हमी योजनेशी संबंधित सर्व विषय | निवासी नायब तहसिलदार | तहसिलदार | उपविभागीय अधिकारी (महसूल) |